महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.
दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापू/विवि/बीबीए-बीसीए अंतिम मान्यता २०२४-२०२५ / 656 दिनांक 24 FEB 2025

महत्वाचे परिपत्रक ( अंतिम स्मरणपत्र )

प्रति,
संचालक/प्राचार्य
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित ,
विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित,
बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड
अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना तसेच या संस्थातील सदर अभ्यास क्रमानां शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करून संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर न करणाऱ्या संस्थाबाबत**

संदर्भ: १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता -२०२४/प्र.क्र.२४५/तांशि दि.०७/०८/२०२४
२) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२४ /५७९/ दिनांक ०८/०८/२०२४
३) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२४ /६०६ / दिनांक १६/०८/२०२४
४) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२५ /६९ / दिनांक २८/०१/२०२५
५ ) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापू/विवि /बीबी ए —बीसी ए २०२४-२५ /२०२५/३७५ दिनांक ३१/०१/२०२५
६ ) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापू/विवि /बीबी ए —बीसी ए अंतिम मान्यता २०२४-२५ /२०२५/६२२ दिनांक २०/०२/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या यांच्या अखत्यारीत असलेल्या बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना तसेच या संस्थातील सदर अभ्यास क्रमानां शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करून संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करणेबाबत संदर्भीय क्रमांक ५ आणि ६ द्वारे सूचित केले होते.

परंतु सोबत जोडलेल्या यादीतील संस्थांनी अद्याप संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी संदर्भीय परिपत्रकानुसार https://approval2024.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत. शिवाय मूळ कागदपत्रे तपासणीसाठी आणि सादर करणेसाठी या विभागीय कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. **तरी सोबत जोडलेल्या यादीतील संस्थाना सूचित करण्यात येते कि वर नमूद केलेल्या संकेतस्थळाची लिंक केव्हाही बंद होऊ शकते त्यामुळे तात्काळ आजच वरील लिंक वर कागदपत्रे अपलोड करावेत आणि अपलोड केलेली मूळ कागदपत्रे सह या विभागीय कार्यालयात आजच तपासणीसाठी उपस्थित राहावे. ज्या संस्था मूळ कागदपत्रे अपलोड करणार नाहीत शिवाय मूळ कागदपत्रांसह उपस्थित राहणार नाहीत अशा संस्थाना अंतिम मान्यतेसाठी हे विभागीय कार्यालय शिफारस करणार नाही.** *अंतिम मान्यते अभावी संस्थाना भविष्यात अडचणी उद्भवलयास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाची राहील याची संबधित संस्थांनी नोंद घ्यावी. यापुढे या संदर्भात कोणतेही स्मरणपत्र पाठविले जाणार नाही याची सोबत जोडलेल्या यादीतील संस्थांनी नोंद घ्यावी.*

सोबत : संदर्भ क्रमांक २ ते ६ परिपत्रके

24/7/24

(श्री .कि .भा .कुलकर्णी )
सहायक संचालक (तांत्रिक )
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता

# बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या अंतिम मान्यतेची पूर्तता न करणाऱ्या संस्था

| Sr. | Institute Code | Institute Name | Application Status |
|---|---|---|---|
| 1 | 6001 | Department of Management Sciences (PUMBA), University of Pune | Pending |
| 2 | 6037 | KARMAVEER BHAURAO PATIL UNIVERSITY SATARA | Pending |
| 3 | 6039 | MODERN COLLEGE KOLHAPUR | Filled and Locked But not Submitted |
| 4 | 6366 | Saibalaji Education Society, International Institute of Management & Human Resource Development(W), Nere | Filled and Locked But not Submitted |
| 5 | 6650 | Vishwakarma Dadasaheb Chavan Institute of Management and Research, Malwadi | Pending |
| 6 | 6781 | Bhagwant Institute of Technology, Barshi | Filled and Locked But not Submitted |
| 7 | 6783 | Saibalaji Education Society, Saibalaji International Institute of Management Sciences,Nere Marunje, Hinjewadi, Pune | Filled and Locked But not Submitted |
| 8 | 6992 | Pune Cambridge Institute of Management and Computer Application, Ambegaon Pathar, Pune | Filled and Locked But not Submitted |
| 9 | 16143 | SOU MANGALTAI RAMCHANDRA JAGTAP MAHIALA MAHAVIDYALAYA UMBRAJ | Pending |
| 10 | 16146 | SHRIPATRAO KADAM MAHAVIDYALAYA SHIRWAL | Pending |
| 11 | 16168 | RAJARAM SHIKSHAN SANSTHA'S | Pending |
| 12 | 16185 | DR. BABASAHEB AMBEDKAR COLLEGE | Filled and Locked But not Submitted |
| 13 | 16220 | NEW SATARA COLLEGE OF BCA | Pending |
| 14 | 16245 | SYNERGY SCHOOL OF COMMERCE | Pending |
| 15 | 16249 | GLOBAL VILLAGE ARTS SCIENCE AND COMMERCE COLLEGE BORAMANI | Filled and Locked But not Submitted |
| 16 | 16268 | ST MIRA'S COLLEGE FOR GIRLS | Filled and Locked But not Submitted |
| 17 | 16301 | INTERNATIONAL SCHOOL OF MANAGEMENT AND RESEARCH | Filled and Locked But not Submitted |
| 18 | 16314 | International Institute of Management Studies, Hinjewadi Pune | Pending |

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

जा. क्र. : तंशिविकापू/विवि/बीबीए-बीसीए अंतिम मान्यता २०२४-२०२५ / 622 दिनांक 20 FEB 2025

महत्वाचे परिपत्रक ( स्मरणपत्र )

प्रति,
संचालक/प्राचार्य
या कार्यालयाच्या अधिनस्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित ,
विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित,
बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड
अभ्यासक्रमाच्या संस्था

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना तसेच या संस्थातील सदर अभ्यास क्रमानां शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करून संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करणेबाबत ....**

संदर्भ: १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता -२०२४/प्र.क्र.२४५/तांशि दि.०७/०८/२०२४
२) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२४ /५७९/ दिनांक ०८/०८/२०२४
३) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२४ /६०६ / दिनांक १६/०८/२०२४
४) मा.संचालक , तंत्रशिक्षण संचालनालय , म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र.२/एनजीसी /BBA BCA डीटी ई मान्यता /२०२५ /६९ / दिनांक २८/०१/२०२५
५ ) या विभागीय कार्यालयाचे परिपत्रक क्रमांक तंशिविकापू/विवि /बीबी ए –बीसी ए २०२४-२५ /२०२५/३७५ दिनांक ३१/०१/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून, शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद , नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बीबीए , बीबीएम , बीएमएस , बीसीए , एमबीए इंटिग्रेटेड व एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्थाना तसेच या संस्थातील सदर अभ्यास क्रमानां शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करून संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पद्धतीने सादर करणेबाबत संदर्भीय क्रमांक ५ द्वारे सूचित केले होते.

परंतु सोबत जोडलेल्या यादीतील संस्थांनी अद्याप संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी संदर्भीय परिपत्रकानुसार https://approval2024.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर कागदपत्रे अपलोड केलेली नाहीत . शिवाय मूळ कागदपत्रे तपासणीसाठी आणि सादर करणेसाठी या विभागीय कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. सबब सदरील संस्थाना अंतिम मान्यतेसाठी हे विभागीय कार्यालय शिफारस करणार नाही. अंतिम मान्यते अभावी संस्थाना भविष्यात अडचणी उद्भवलयास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाची राहील याची संबधित संस्थांनी नोंद घ्यावी.

सोबत : संदर्भ क्रमांक २ ते ५ परिपत्रके

( डॉ.द.व्यं.जाधव )
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता

महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

जा क्रः तंशिविकापु/विवि/बीबीए-बीसीए २०२४-२५/२०२५/375 दिनांक : ३१.०१.२०२५

31 JAN 2025

**महत्वाचे परिपत्रक (कालमर्यादा)**

प्रति,
प्राचार्य / संचालक,
अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली मान्यताप्राप्त
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित
बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड व
एमसीए इंटिग्रेटेड अभ्यासक्रमाच्या संस्था
पुणे विभाग.

**विषयः शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बीबीए, बीबीएम, बीएमएस, बीसीए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करुन संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पध्दतीने व ऑफलाईन पध्दतीने सादर करणेबाबत..**

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र. मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४, दि. ०७.०८.२०२४
२) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/५७९ दिनांक ०८.०८.२०२४.
३) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६०६ दिनांक १६.०८.२०२४.
४) मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे परिपत्रक क्र. २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२५/६९ दिनांक २८.०१.२०२५.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए., एम.बी.ए. इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांमधील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केली आहे. सदर मान्यतेस अनुसरुन संस्थांना संकेतांक आणि पासवर्ड विभागीय कार्यालयांमार्फत प्रदान करुन प्रवेश क्षमता मान्यतेनंतर संस्थांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात आले आहे.

शासन निर्णयात नमूद केल्यानुसार व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार संस्थांनी सदर अभ्यासक्रमास संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी संचालनालयाने संदर्भाधीन क्रमांक २ व ३ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे)

संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी संस्थांनी संदर्भ क्रमांक ४ मधील परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या **https://approval2024.dtemaharashtra.gov.in** या संकेतस्थळावर नोंदणी करुन कागदपत्रे अपलोड करावीत. संचालनालयाच्या अंतिम मान्यतेसाठी संस्थांनी संदर्भ क्रमांक २ मधील परिपत्रकासोबत जोडलेल्या विवरणपत्र अ मधील अ.क्र. १ ते ६ ची मूळ कागदपत्रांची फाईल सादर करणे आवश्यक आहे. सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार या विभागीय कार्यालयामध्ये ऑनलाईन सादर केलेल्या कागदपत्रांची मूळ कागदपत्रांवरुन तपासणीसाठी उपस्थित रहाणे आवश्यक आहे.

संस्थांनी ऑनलाईन प्रणालीद्वारे सादर केलेल्या माहितीस अनुसरुन हे विभागीय कार्यालय आपल्या संस्थेची शिफारस संचालनालयाचे अंतिम मान्यतेसाठी शिफारस करणार आहे. जर सदर माहिती बिनचुक असणे आवश्यक आहे, सदर माहिती अपुर्ण अथवा चुकीची आढळून आल्यास किंवा ज्या संस्था ऑनलाईन माहिती भरणार नाहित अशा संस्थांची अंतिम मान्यतेसाठी शिफारस करण्यात येणार नाही. अंतिम मान्यते अभावी संस्थांना भविष्यात अडचणी उद्‌भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थांची राहील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

संस्थांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन कागदपत्रे / माहिती सादर करण्यासाठी येणा-या तांत्रिक अडचणींचे निराकरण करण्यासाठी सोमवार दिनांक ०३.०२.२०२५ रोजी सकाळी ११.१५ वाजता ऑनलाईन सत्र घेण्यात येणार असून सदर सत्रामध्ये आपणास या विभागीय स्तरावर सोडविण्यासारख्या काही तांत्रिकी अडचणी असतील तर त्याचे तात्काळ निराकरण करण्यात येईल. सोबत ऑनलाईन सत्राची लिंक दिलेली आहे.

लिंक : https://meet.google.com/bwm-jyvu-ynb

**सोबतः वेळापत्रक व संदर्भ क्र. २, ३ व ४ मधील परिपत्रके.**

(मारुती जाधव)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रतः मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई (कार्यासन क्र. २) यांना माहितीस्तव.

## <u>कागदपत्रे सादर करण्याकरिताचे वेळापत्रक</u>

| अ.क्र. | दिनांक | सत्र | जिल्हा |
|---|---|---|---|
| १ | १२.०२.२०२५ | सकाळचे सत्र | सांगली जिल्ह्यातील संस्था. |
| २ | | दुपार नंतरचे सत्र | कोल्हापूर जिल्ह्यातील संस्था. |
| ३ | १३.०२.२०२५ | सकाळचे सत्र | सातारा जिल्ह्यातील संस्था. |
| ४ | | दुपार नंतरचे सत्र | सोलापूर जिल्ह्यातील संस्था. |
| ५ | १७ व १८.०२.२०२५ | -- | पुणे जिल्ह्यातील संस्था. |

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४७५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://dte.maharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक : २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२५/ ८९ दिनांक : 28 JAN 2025

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/पुणे

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करून संचालनालयाचे अंतिम मान्यतेचे आदेश निर्गमित करण्यासाठी माहिती ऑनलाईन पध्दतीने व ऑफ लाईन पध्दतीने सादर करणेबाबत व प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेशी पडताळणी व प्रवेश मान्येतेची प्रक्रिया करणेबाबत....

संदर्भ : १)शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४,दि. ७.८.२०२४
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/५७९, दि.८.८.२०२४
३)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६०६, दि.१६.८.२०२४
४)संचालनालयाचे पत्र क्र.२/एनजीसी/गुणवत्ता यादी पडताळणी/२०२४/९४३, दि.१४.११.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केली आहे . सदर मान्यतेस अनुसरून संस्थांना संकेतांक आणि पासवर्ड विभागीय कार्यालयांमार्फत प्रदान करुन प्रवेश क्षमता मान्यतेनंतर संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात आले आहे.

शासन निर्णयात नमूद केल्यानुसार व अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार संस्थांनी सदर अभ्यासक्रमास संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी संचालनालयाने संदर्भाधीन क्रमांक २ व ३ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत. (प्रत सोबत जोडली आहे)

यापुर्वी संस्थांना शासन मान्यता मिळाल्यानंतर संस्थां शासन निर्णयातील अटी व शर्ती पुर्तता करण्यासाठी या संचालनालयात येऊन कागदपत्रे / शपथपत्रे सादर करीत असत. त्या कागदपत्रांच्या पडताळणी अंति संचालनालयामार्फत संस्थांना मान्यता पत्र निर्गमित करण्यात येत होते. शै.वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.सी.ए या अभ्यासक्रमांच्या संस्थांना प्रथमत: अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या अखत्यारीत आल्याने परिषदेने दिलेल्या मान्यतेनंतर त्या सर्व संस्थांच्या शासन मान्यतेसाठी एकत्रित शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. राज्यात बी.बी.ए., बी.सी.ए. अभ्यासक्रमाच्या साधारणत: ६५० संस्था आहेत. या सर्व संस्थांना संचालनालयात उपस्थित राहून संबंधित कागदपत्रे सादर करण्याऐवजी ती सर्व कागदपत्रे त्या-त्या विभागीय कार्यालयाकडे जमा करून घेऊन ऑनलाईन

पध्दतीने विभागीय कार्यालयाची शिफारस मागवून संचालनालयाची मान्यतेची कार्यवाही संस्थांसाठी सुकर करण्यात येत आहे. त्यासाठी खालील पध्दत अवलंबविण्यात येत आहे.

सदर संस्थांना संचालनालयाची अंतिम मान्यता प्रदान करण्यासाठी संचालनालय स्तरावरून आनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. संबंधित संस्थांनी https://approval2024.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावरून नोंदणी करून कागदपत्रे अपलोड करावीत. विभागीय कार्यालय स्तरावर सदर कागदपत्रांची प्रत्यक्ष पडताळणी करण्याची कार्यवाही करण्यात येईल. संचालनालयामार्फत करण्यात येणाऱ्या ऑनलाईन प्रणालीमध्ये संबंधित संस्थांनी अद्यावत माहिती भरून आवश्यक ती सर्व कागदपत्रे अपलोड करणे अनिवार्य आहे.

संचालनालयाच्या अंतिम मान्यतेसाठी संस्थांनी सोबत जोडलेल्या यादीतील अ.क्र.१ ते ६ ची मूळ कागदपत्रे सादर करणे आवश्यक आहे. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी शै वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत (As and Where ) परिषदेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली असल्याने परिपत्रकात नमूद केलेली ७ ते १९ समोर नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे संस्थांना ऐच्छिक असल्याचे यापुर्वी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

संस्थांनी माहिती अद्ययावत केल्यानंतर विभागीय कार्यालय यांनी संस्थांच्या मूळ कागदपत्रांची ऑनलाईन पध्दतीने संस्थेने अपलोड केलेल्या कागदपत्रांवरून पडताळणी करावयाची कार्यवाही दि.२१.०२.२०२५ रोजी पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. पडताळणी अंति ऑनलाईन पध्दतीने त्या संस्थेची शिफारस संचालनालयाचे मान्यता प्रमाणपत्र देण्यासाठी करण्यात यावी. ऑनलाईन पोर्टलवर संस्थेने व विभागीय कार्यालयाने करावयाच्या कार्यवाहीची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद करण्यात आलेली आहे. संस्थेने सादर केलेल्या दोन शपथपत्रांच्या "मुळप्रती" विभागीय कार्यालयात जतन करून ठेवण्यात याव्यात व सर्व संस्थांच्या कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर ते सर्व संस्थानिहाय एकत्रितरीत्या संचालनालयास सादर करावेत.

तसेच विभागीय कार्यालयांनी पडताळणी केल्यानंतर ऑनलाईन प्रणालीव्दारे सादर केलेल्या माहितीस अनुसरून संचालनालय स्तरावरून मान्यतेची कार्यवाही करण्यात येणार आहे. विभागीय कार्यालयांनी प्रमाणित केलेल्या माहितीनुसार संस्थांना अंतिम मान्यता प्रदान करण्यात येणार असल्याने माहिती बिनचुक असणे आवश्यक आहे, सदर माहिती अपूर्ण अथवा चुकीची आढळून आल्यास व भविष्यात अडचणी उद्भवल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विभागीय कार्यालयाची राहील याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

विभागीय कार्यालयाच्या शिफारशीनंतर संचालनालयाच्या मान्यता पत्राचे आदेश एकत्रितरित्या निर्गमित करण्यात येतील. संचालनालयाचे मान्यता प्रमाणपत्र निर्गमित करण्यासाठी आपल्या स्तरावरून शिफारस करण्यात आलेल्या संस्थेतील बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांसाठी शै.वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी ऑनलाईन व ऑफलाईन पध्दतीने दि.२१.०२.२०२५ रोजी पर्यंत करण्यात यावी. तसेच शै.वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी करतांना संचालनालयाचे संदर्भ क्र.४ च्या पत्रान्वये दिलेल्या सुचनांचे अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**Proforma 'A'**

**SOP for BBA/BMS/BCA Institutes**

All UG/PG Institutes which have BBA/BMS or BCA courses for AY 2024-25, are hereby informed to follow the Instructions given below to get final approval for the courses.

**Important Instructions:**

1. Login on https://approval2024.dtemaharashtra.gov.in
2. Use Login ID as "INST_DTE CODE" with the default Password as "INST_DTE CODE" e.g. For Inst 6015 => Login ID = INST_6015 and Password = INST_6015
3. Set New Password.
4. OTP will be sent to registered email used for UG/PG Approval system.
5. Fill in the data pertaining to the Fixed Deposit, Intake details with processing fees details.
6. Upload the documents
7. Verify the details and lock the application for approval. Once the data is locked, the Institute shall not be able to change the data or upload any new document
8. The institute shall submit Application along with required document to the respective regional office.
9. The submitted application shall be verified by the respective Regional Office online through their login. The RO shall retain the FD and Affidavit.
10. The Institute shall be able to download approval letter through their login after approval by the DTE office.

******

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल:- desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे/कालमर्यादित

परिपत्रक

क्रमांक : २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/५५९ दिनांक :- 8 AUG 2024

प्रति,
संचालक / प्राचार्य,
बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए,
एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तींची पुर्तता करून संचालनालयाच्या मान्यतेबाबत....

संदर्भ : शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४,दिनांक ७.८.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केली आहे.

सदर शासन निर्णयांत नमूद केल्यानुसार शासन, शिखर परिषदा यांच्या अटी व शर्ती यांची पुर्तता, संयुक्त खात्यात मुदतठेव व शासन निर्णयातील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचा करारनामा इ. कागदपत्रांची तपासणी करावयाची आहे. ज्या संस्था यापूर्वी उच्च् शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीत आहेत अशा संस्था ह्या उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राहतील. परंतू सदर अभ्यासक्रमाचे परिचालन व सदरील अभ्यासक्रमांची मान्यता प्रक्रिया, प्रवेश, शुल्क इ. बाबी ह्या तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली राहतील. त्यामुळे त्यांना सदर अभ्यासक्रमासाठी डिटीई संकेतांक घेणे गरजेचे आहे. तसेच शासन निर्णयानुसार मान्यता दिलेले अभ्यासक्रम चालविणारी पुर्णत: नवीन संस्था ही तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखाली कायम विनाअनुदानित तत्वावर / स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर राहणार आहे व त्यांनासुध्दा डिटीई संकेतांक घेणे गरजेचे आहे.

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील ज्या संस्थांनी उपरोक्त अभ्यासक्रमास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून मान्यता घेतली आहे त्यांना पुन्हा नव्याने डिटीई संकेतांक घेण्याची आवश्यकता नाही.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची मान्यता असलेले सदर अभ्यासक्रम हे शासनातर्फे व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात आले असल्याने सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे होणार आहेत.

या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेला अल्प कालावधी विचारात घेता व सदर अभ्यासक्रमाच्या संस्थांची संख्या विचारात घेता डिटीई संकेतांक घेण्यासाठी खालील पध्दती अवलंबण्यात येणार आहे.

१. संदर्भाधीन शासन निर्णयान्वये मान्यता मिळालेल्या संस्थांनी सर्वप्रथम सदर अभ्यासक्रमासाठी संबंधित विद्यापीठाचे संलग्नीकरण प्राप्त करुन घ्यावे.

२. संस्थेने खालील ६ कागदपत्रांची पूर्तता करणे अनिवार्य राहील.

| | |
|---|---|
| १. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता दिलेल्या मान्यता आदेशाची प्रत |
| २. | शासनामार्फत मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत. |
| ३. | प्रस्तावित अभ्यासक्रमांसाठी संबंधीत विद्यापीठाने दिलेल्या संलग्नता आदेशाची प्रत |
| ४. | विहीत नमुन्यातील प्रपत्र - 'अ' व 'ब' प्रमाणे रु. १००/- च्या स्टॅंप पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) या संचालनालयास सादर करावयाची मूळ प्रत |
| ५. | शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये विहीत (प्रत सोबत जोडली आहे) केल्यानुसार १० वर्ष मुदतीसाठी करण्यात आलेली संयुक्त मुदतठेवीची मुळपावती व त्याची साक्षांकित प्रत. ( मुदतठेव संबंधित संस्थेच्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव आणि संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या नावाने तसेच operation mode -Jointly असणे आवश्यक आहे) |
| ६. | शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार विहित नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास जमा करुन त्याची पावती सोबत जोडावी.<br>ज्या संस्थांनी उच्च शिक्षण विभागाकडे नोंदणी करण्यासाठी दि. १५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये शुल्क भरणा केली असेल त्या संस्थांनी उच्च् शिक्षण विभागाकडे शुल्क भरल्याची पावती दाखवून दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयात दर्शविल्याप्रमाणे फरकाची रक्कम संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे जमा करावी. |

३. संस्थेने मुद्दा क्रमांक २ मध्ये नमूद कागदपत्रे संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास सादर करावीत. तसेच संस्था उच्च शिक्षण संचालनालयाच्या अथवा तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील आहे किंवा कसे याबाबतची कागदपत्रेही विभागीय कार्यालयास सादर करावीत. मूळ कागदपत्रे तपासून व त्या कागदपत्रांची एक सत्यप्रत विभागीय कार्यालयाकडे ठेवून विभागीय कार्यालय संस्थेस डिटीई संकेतांक व त्यासाठीचा पासवर्ड देण्यात येईल. विभागीय कार्यालय मूळ कागदपत्रे संस्थेकडे परत करेल.

४. संस्थेने डिटीई संकेतांक व पासवर्डचा उपयोग करुन प्रवेशासाठी आवश्यक ती माहिती ugpg२४.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करावी तसेच पोर्टलवर नमूद कागदपत्रे अपलोड करुन संस्थेच्या लॉगइनमधून ती माहिती लॉक करुन प्रवेशक्षमता पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने दिनांक १९.८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करावी. संस्थेने नोंदविलेली माहिती लॉक करण्यापूर्वी ती अचुक असल्याची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. सदरची माहिती प्रवेशप्रक्रियेसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षातर्फे उपयोगात आणण्यात येणार असल्याने त्याची संवेदनशीलता विचारात घेऊन संस्थांनी माहिती अद्ययावत करावी. ज्या संस्था विहीत मुदतीत माहिती अद्ययावत करणार नाहीत त्या संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत होणार नाही याची संस्थांनी गांभीर्याने नोंद घ्यावी.

५. विभागीय कार्यालयाने संस्थेची माहिती अचूक असल्याची पडताळणी करुन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी प्रवेशक्षमता दिनांक २१.८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निश्चित करावी.

संस्थांना संकेतांक प्रदान झाल्यानंतर त्यांचेकडून संकेतस्थळावर माहिती अद्ययावत करुन विभागीय कार्यालयाकडून प्रवेशक्षमता व संलग्नीकरणाची माहिती विहीत मुदतीत निश्चित झाल्यानंतर संस्थेचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येईल.

तदनंतर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संस्थांनी सदर अभ्यासक्रमास संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या अ.क्र. १ ते ७ समोर नमूद केलेल्या मूळ कागदपत्रांसह तसेच सोबतच्या विवरणपत्रात नमूद अनुक्रमांक १ ते १९ वरील सर्व कागदपत्र सॉफ्ट कॉपी स्वरुपात (PDF format मध्ये) विवरणपत्रात नमूद केलेल्या क्रमानुसार व पृष्ठ क्रमांक नमूद करुन या संचालनालयास सादर करावीत. सदर माहिती सादर करण्यासाठीचे वेळापत्रक स्वतंत्रपणे कळविण्यात येईल त्यानुसार संबंधित संस्थांनी संचालनालयात उपस्थित राहणे आवश्यक असेल. सॉफ्ट फाईलचे नाव BBA/BBM/BMS/BCA/(यापैकी लागू असेल तो अभ्यासक्रम नमूद करुन)_२०२४-२५" असे ठेवावे. याबाबत असेही नमूद करण्यात येते की, विवरणपत्रातील अनुक्रमांक १ ते ६ समोरील कागदपत्रांशिवाय उर्वरीत कागदपत्र हार्डकॉपी स्वरुपात (फाईल) संचालनालयात सादर करु नयेत.

संबंधित संस्थांनी सोबतच्या विवरणपत्र - अ मध्ये नमूद केल्यानुसार कागदपत्रांसह व सॉफ्ट कॉपीसह या संचालनालयास सादर करुन मान्यता घेण्यात यावी, अन्यथा संबंधीत अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ मधील प्रवेशाबाबत व मान्यतेबाबत संबंधित संस्थांना काही समस्या उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थांची राहील, याची नोंद घेण्यात यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : १. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित संस्थांना आपले स्तरावरुन सदर परिपत्रक अग्रेषित करण्यात यावे. या संचालनालयाकडून आपणास संस्थेचा संकेतांक व पासवर्ड उपलब्ध करुन देण्यात येईल. उपरोक्त मुद्दा क्रमांक २ व ३ मध्ये नमूद केल्यानुसार कागदपत्रांची अचूक पडताळणी करुन , त्या कागदपत्रांची एक प्रत जतन करुन संचालनालयाकडून प्राप्त संस्थेचा संकेतांक व पासवर्ड संस्थेस देण्यात यावा. या अभ्यासक्रमाच्या बहुसंख्य संस्था पहिल्यांदाच तंत्रशिक्षण संचालनालयाच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे त्यांना प्रणालीसंबंधी आवश्यक ते मार्गदर्शन करावे. तसेच संस्थेने पोर्टलवर भरलेली माहिती पडताळणी करुन दिनांक २०.८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निश्चित करण्यात यावी.

तसेच ज्या संस्थांनी त्यांचे अर्जासाठी शासन निर्णय क्रमांक टीईएम- २०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ अन्वये विहित नोंदणी शुल्क आपले कार्यालयास अदा केले नसल्यास ते त्यांचेकडून वसूल करण्यात यावे. ज्या संस्थांनी उच्च शिक्षण विभागाकडे नोंदणी करण्यासाठी दि. १५.०७.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वयें शुल्क भरणा केली असेल त्या संस्थांनी उच्च् शिक्षण विभागाकडे शुल्क भरल्याची पावती तपासून त्याची प्रत घ्यावी व दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयात दर्शविल्याप्रमाणे फरकाची रक्कम वसूल करुन त्याची पावती देण्यात यावी.

त्याचप्रमाणे संदर्भाधीन शासन निर्णयात नमूद संस्थांची उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विद्यमान संस्था, तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील विद्यमान संस्था व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील नवीन संस्था यांची वर्गवारी करुन त्याची माहिती स्वतंत्रपणे संचालनालयास सादर करावी.

२. कार्यासन क्रमांक ३, आयटी सेल, मुख्य कार्यालय, मुंबई यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी. तसेच त्यांनी संस्थेचा संकेतांक व पासवर्ड तयार करुन सर्व संबंधित विभागीय सहसंचालक यांना गोपनीयरित्या पाठवावा.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४९२/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे
परिपत्रक
क्रमांक : २/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/६०६ दिनांक : 16 AUG 2024

प्रति,
संचालक / प्राचार्य,
बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए,
एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद,नवी दिल्ली यांच्या अखत्यारीत आलेल्या बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना शासनाने दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने शासन निर्णयातील अटी व शर्तीची पुर्तता करून संचालनालयाच्या मान्यतेबाबत....

संदर्भ : १)शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.मान्यता-२०२४/प्र.क्र.२४५/तांशि-४,दि. ७.८.२०२४
२)संचालनालयाचे परिपत्रक क्र.२/एनजीसी/BBA BCA डीटीई मान्यता/२०२४/५७९, दि.८.८.२०२४

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी दिलेल्या मान्यतेस अनुसरून शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयान्वये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना तसेच या संस्थांतील सदर अभ्यासक्रमांना मान्यता प्रदान केली आहे व सदर मान्यतेस अनुसरून संबंधित संस्थांना संकेतांक आणि पासवर्ड विभागीय कार्यालयांमार्फत प्रदान करण्याच्या सूचना तसेच त्यांची प्रवेशक्षमतेस मान्यता देण्यासंदर्भात सूचना संदर्भाधीन परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांकडून कार्यवाही सुरू आहे. संस्थांना प्रवेशक्षमता मान्यतेनंतर संस्थांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत सामावून घेण्यात येणार आहे.

वरील कार्यवाही झाल्यानंतर व प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर शासन निर्णयात नमूद केल्यानुसार संस्थांनी सदर अभ्यासक्रमास संचालनालयाची अंतिम मान्यता घेण्यासाठी अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानकानुसार उपरोक्त मूळ कागदपत्रांसह अन्य कागदपत्रे (प्रपत्र अ मध्ये नमूद केलेली १ ते १९) सादर करण्यास संस्थांना कळविलेले आहे.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद नवी दिल्ली यांनी शै वर्ष २०२४-२५ मध्ये बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमाच्या संस्थांना आहे त्या स्थितीत (As and Where) परिषदेच्या अधिपत्याखालील अभ्यासक्रमात सहभागी होण्यास मान्यता दिलेली असल्याने परिपत्रकात नमूद केलेली ७ ते १९ समोर नमूद केलेली कागदपत्रे सादर करणे संस्थांना ऐच्छिक राहिल.

बी.बी.ए., बी.बी.एम., बी.एम.एस., बी.सी.ए, एमबीए इंटिग्रेटेड आणि एमसीए इंटिग्रेटेड या अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मधील Annexure A च्या अ.क्र.४ समोर नमूद दराप्रमाणे नोंदणी शुल्क आकारण्यात येईल. तसेच सदय:स्थितीत उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण

यांच्या अखत्यारीत नसलेली व पूर्णत: नवीन संस्था असल्यास त्यांचेकडून Annexure A मधील अ.क्र.३ समोर नमूद दराप्रमाणे नोंदणी शुल्क आकारण्यात येईल.

तसेच उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण यांच्या अधिपत्याखालील विद्यमान संस्थांकडून शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ च्या Annexure B मधील अ.क्र. ७ समोर नमूद दराप्रमाणे संयुक्त नावाने मुदत ठेवी सादर करणे आवश्यक असेल. तसेच सद्य:स्थितीत उच्च शिक्षण व तंत्रशिक्षण यांच्या अखत्यारीत नसलेली व पूर्णत: नवीन संस्था असल्यास त्यांचेकडून Annexure B मधील अ.क्र. ३ समोर नमूद दराप्रमाणे संयुक्त नावाने मुदत ठेवीस संस्थांना सादर करणे आवश्यक असेल.

संस्थांची माहिती ugpg२४.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर अद्ययावत करणे तसेच पोर्टलवर नमूद कागदपत्रे अपलोड करुन संस्थेच्या लॉगइनमधून ती माहिती लॉक करुन प्रवेशक्षमता पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयाकडे ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यास दिनांक २८.८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. विभागीय कार्यालयाने संस्थेची माहिती अचुक असल्याची पडताळणी करुन केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी प्रवेशक्षमता दिनांक ३०.८.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत निश्चित करावी.

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया संपन्न झाल्यानंतर संचालनालयाची मान्यता देण्यास्तव या संस्थांकडून कागदपत्रे संचालनालयास सादर करण्याचे वेळापत्रक प्रसिध्द करण्यात येईल. त्यावेळी परिपत्रकात नमूद केलेली १ ते ६ समोरील मूळ तसेच पीडीएफ स्वरुपात कागदपत्रे संस्थांनी सादर करावीत.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : मा.प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :.. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/छत्रपती संभाजीनगर/मुंबई/ नागपूर/नाशिक/ पुणे

त्यांना कळविण्यात येते की, आपल्या विभागाच्या कार्यक्षेत्रातील सर्व संबंधित संस्थाना आपले स्तरावरुन सदर परिपत्रक अग्रेषित करण्यात यावे.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य**

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४००००१.

दूरध्वनी क्र.022-६८५९७४६५, ४७५, ४९२, ४४२, ४४३, ४४७

ई-मेल - desk२@dtemaharashtra.gov.in  वेबसाईट : http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक : २/एनजीसी/गुणवत्ता यादी पडताळणी/२०२४/९०३  दिनांक : 14 NOV 2024

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई, पुणे, नाशिक, छ.संभाजीनगर, अमरावती, नागपूर

विषय : शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया....

संदर्भ : मा.सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांचे पत्र क्रमांक संकीर्ण/२२२४/प्र.क्र.३४९/प्रनिप्रा/६१९६, दिनांक ३१.१०.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संपन्न होत आलेली आहे. प्रवेशाच्या अंतिम दिनांकापर्यंत करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाची मान्यता घेणे बंधनकारक असते. महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संपूर्ण माहितीसह प्रवेशाच्या अंतिम दिनांकानंतर १५ दिवसाच्या आत संचालनालयाकडे प्रवेश मंजूरीचे प्रस्ताव सादर करावेत. संचालनालयाकडून प्रमाणित केलेले प्रस्ताव संस्थांनी दोन महिन्यांच्या कालमर्यादेत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे सादर करावेत. प्रवेश मंजूरीच्या प्रस्तावासोबत प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा करणे बंधनकारक राहील. प्रवेश प्रक्रिया शुल्काचा भरणा करणेबाबत प्राधिकरणाकडून स्वतंत्ररित्या कळविण्यात येईल, असे प्रवेश नियामक प्राधिकरणाने संदर्भाधीन पत्रान्वये कळविले आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता आपल्या अधिनस्त सर्व शासकीय/ अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची तपासणी करण्याकरिता संचालनालयाच्यावतीने आपणास प्राधिकृत करण्यात येत आहे. आपल्या कार्यालयाने पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादया सही शिक्यासह अंतिम मान्यतेकरिता प्रवेश नियामक प्राधिकरणास सादर करण्यासाठी आपणांस प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच आपल्या कार्यालयाने पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन यादया अंतिम मान्यतेकरिता संचालनालयास सादर करण्यात याव्यात.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम,२०१५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारित झालेले प्रवेश नियम/ शासन निर्णय/ अधिसुचना/ न्यायालयीन आदेश व विहीत केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल संचालनालयामार्फत सादर झाल्याशिवाय शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमातील प्रवेशांना प्रवेश नियामक

प्राधिकरणाची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील. ही बाब आपल्या विभागातील सर्व पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास आणावी.

प्रवेश यादी पडताळणी करताना खालील बाबींची पडताळणी करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात याव्यात.

१. प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करण्यात आलेल्या संस्थेस संबंधित सक्षम प्राधिकरणाची (AICTE/PCI/COA) परवानगी असल्याचे कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावीत.

२. संस्थेस नवीन संस्था / नवीन अभ्यासक्रम किंवा प्रवेश क्षमता बदलास मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत आणि तदनंतर संचालनालयाच्या अंतिम मान्यतेची प्रत या कागदपत्रांची पडताळणी करण्यात यावी.

३. नवीन संस्थांनी आवश्यक रकमेची नियत ठेव (FD) भरणा केली आहे किंवा नाही याची पडताळणी करावी , भरली नसल्यास ती ठेव भरणा केल्यानंतर प्रवेश यादी पडताळणीची कार्यवाही करावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये ज्या संस्थांना थेट अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ/घट यास परवानगी देण्यात आलेली आहे, अशा आपल्या विभागातील संस्थांकडून नोंदणी शुल्क घेण्यात यावे. या अनुषंगिक बाबींची कार्यवाही करण्याची जबाबदारी आपल्या कार्यालयाची राहिल याची नोंद घ्यावी.

४. संस्था स्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील (ACAP) प्रवेशाकरिता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी दिलेल्या सुचनांच्या अनुषंगाने प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुणवत्तेनुसार प्रवेश केले आहेत, इत्यादी बाबींची काळजीपूर्वक पडताळणी करण्यात यावी.

५. अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबंधित सर्व कागदपत्रांची संबंधित संस्थेच्या प्राचार्यांनी / संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र पडताळणीवेळी तपासावे.

६. सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश यादया पडताळणी करतांना प्रवेशित उमेदवारांची संबंधित अभ्यासक्रमनिहाय शैक्षणिक अर्हतेची व प्रकरण परत्वे इतर सर्व कागदपत्रांची विशेषत्वाने पडताळणी करणे आवश्यक आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या प्रयोजनासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी प्रसिध्द केलेल्या माहितीपुस्तिकेमध्ये नमूद केल्यानुसार अर्हता ग्राहय धरता येईल.

७. संस्थेकडून प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर झाल्यानंतर शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संबंधित संस्थेबद्दल काही तक्रार असल्यास त्याबाबत चौकशी करुन अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा. मात्र प्रवेश यादी प्रमाणित करण्याची कार्यवाही प्रलंबित ठेवण्यात येवू नये. तसेच शुल्क परतावा व मूळ कागदपत्रे परताव्याबाबत संस्थेकडे कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र सर्व संबंधित संस्थेच्या प्राचार्यांकडून घेण्यात यावे.

८. अल्पसंख्यांक दर्जाच्या संस्थांच्या बाबतीत त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जाच्या प्रमाणपत्राची व त्याचा वैध कालावधीची पडताळणी करण्यात यावी.

९. मागासवर्गीय उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी पावती सादर करून प्रवेश देण्यात आलेले होते. सदर प्रकरणी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन अशा प्रकरणी पडताळणी करावी.

१०. एखादया विशिष्ट प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालय व मा.उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार ते प्रकरण तपासावे.

प्रवेश यादी पडताळणीसाठीची प्रक्रिया विहीत मुदतीत पूर्ण करुन अंतिम अहवाल राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्याकडे सादर करण्याकरीता संचालनालयास सादर करण्यात यावा.

प्रवेश यादी मंजूर झाल्यानंतर त्यामध्ये नियमबाहय प्रवेश अथवा अनियमितता झाल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपली राहिल याची व्यक्तीशः नोंद घ्यावी.

(डॉ.विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई व मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव

D:\DTENS1_Backup 18 Dec २०२३\२०२४\Merit List_२०२४\Admitted List Verification Letter to RO.docx

## विवरणपत्र अ

| अ.क्र. | कागदपत्रांचा तपशील | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1. | अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली या शिखर परिषदेने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता दिलेल्या मान्यता आदेशाची प्रत | |
| 2. | शासनामार्फत मान्यता दिलेल्या शासन निर्णयाची प्रत व उच्च शिक्षण संचालनालयाशी संबंधित असल्यास संस्थेची माहिती,संस्थेत सुरू असलेले अभ्यासक्रम व प्रवेशक्षमता | |
| 3. | प्रस्तावित अभ्यासक्रमांसाठी संबंधीत विद्यापीठाने दिलेल्या संलग्नता आदेशाची प्रत | |
| 4. | सोबत जोडलेल्या प्रपत्र - 'अ' व 'ब' प्रमाणे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर नोंदणीकृत करारनामा (Agreement) ची मूळप्रत या संचालनालयास सादर करावी. | |
| 5. | शासन निर्णय क्रमांक टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये विहीत (प्रत सोबत जोडली आहे) केल्यानुसार १० वर्ष मुदतीसाठी करण्यात आलेली संयुक्त मुदतठेवीची मुळपावती व त्याची साक्षांकित प्रत. ( मुदतठेव संबंधित संस्थेच्या शिक्षण संस्थेचे अध्यक्ष/सचिव आणि संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या नावाने तसेच operation mode -Jointly असणे आवश्यक आहे) | |
| 6. | शासन निर्णय क्रमांक : टीईएम-२०१८/प्र.क्र.२३/तांशि-४ दि. २२ फेब्रुवारी २०१८ मध्ये नमूद करण्यात आल्यानुसार विहित नोंदणी शुल्क संबंधीत तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास जमा करुन त्याची पावती सोबत जोडावी. | |
| 7. | भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) | |
| 8. | नेमणुक करण्यात आलेल्या प्राचार्यांचा बायो-डाटा. | |
| 9. | संस्थेतील विद्यमान अभ्यासक्रमांसाठी कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांची यादी (नांव, पदनाम, नियुक्तीचा दिनांक, शैक्षणिक अर्हता, अनुभव, वेतनश्रेणी, सध्या घेत असलेले वेतन इ. तपशीलासह) | |
| 10. | प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी नव्याने नियुक्त करण्यात आलेले शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांचे नेमणूक आदेश, रुजू अहवाल यांच्या आदेशाच्या साक्षांकित छायाप्रती. | |
| 11. | अनुक्रमांक १० मध्ये नमूद केल्यानुसार संबंधित शिक्षक व शिक्षेत्तर कर्मचारी यांनी नियुक्ती स्वीकारल्याबाबत संबंधीत संस्थेचे रु. १००/- च्या स्टँप पेपरवर करण्यात आलेले शपथपत्र. | |
| 12. | प्रस्तावित अभ्यासक्रमासाठी खरेदी करण्यात आलेली पुस्तके/ साहित्याची यादी, खरेदी केल्याचे बिल, तसेच संबंधीतास पैसे संबंधीत अभ्यासक्रमाच्या अदा केल्याबाबतच्या पावत्यांच्या साक्षांकीत छायाप्रती. | |
| 13. | इमारतीचे बांधकाम क्षेत्राबाबत इमारतीत वीज, पाणी, टॉयलेट, बाथरुम, लेडीजरुम, इ. सुविधा असल्याबाबत तसेच इमारतीत वीज, पाणी उपलब्ध असल्याबाबत नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र. | |
| 14. | इमारतीत आग प्रतिबंधक यंत्रणा बसविण्यात आल्याबाबतची कागदपत्रे. (सक्षम शासकीय प्रधिकरणाचे फायर अँड सेफ्टी प्रमाणपत्र) | |
| 15. | दाखल जागेचा ७/१२ उतारा / पी.आर. कार्ड | |
| 16. | अकृषक आदेश (N.A. Order) | |
| 17. | बांधकाम पुर्णत्वाचा दाखला | |
| 18. | सोबत जोडलेल्या प्रपत्र क मध्ये ॲडव्हाकेटचे प्रमाणपत्र | |
| 19. | सोबत जोडलेल्या प्रपत्र ड मध्ये नोंदणीकृत आर्किटेक्टचे प्रमाणपत्र | |